**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

श्री. नितिन जगताप,
७९-बी, जनवाडी,
अरुण कदम चौक, गोखलेनगर,
पुणे - ४११ ०१६.

अपीलकर्ता

विरूध्द

१.अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
२.अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगपालिका, पुणे - ५

१. जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त (जि. घ.),
२. जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगपालिका, पुणे - ५

उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/०६/२००८ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये पुणे महानगरपालिकेकडील बांधकाम खात्यासंदर्भात विविध विभागांची माहिती मिळणेबाबत केलेले एकूण ८६ अर्ज. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नितीन जगताप यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये पुणे महानगपालिकेकडे एकूण ८६ माहिती अर्ज व तद्अनुषांगिक प्रथम अपिले दाखल केल्याचे त्यांच्या दि.१२/०४/२००६ च्या निवेदनावरुन दिसून येते. श्री. जगताप यांनी आयोगास त्यासंदर्भात एकत्रित निवेदन सादर केले आहे. मूळ अर्जनिहाय वेगवेगळी स्वतंत्र अपिले दाखल करणे आवश्यक होते.

आयोगाने दि. १२/०६/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नव्हते. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाचे प्रपत्रामध्ये व सोबत सादर केलेल्या निवेदनामध्ये, श्री. जगताप यांचे माहिती मिळणेबाबतचे मुळचे अर्ज हे महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम, २००२ अन्वये असून त्यावर त्या अधिनियमातील तरतुदींप्रमाणे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व मा. उपलोकायुक्त यांच्याकडून योग्य ती कार्यवाही पूर्ण झालेली आहे. सदर अपिलांवर महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये कार्यवाही पूर्ण झालेली असता, आता परत तेच प्रकरण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे फेरसुनावणीसाठी घेणे संयुक्तिक नाही, असे मत नोंदविले आहे, ते मान्य करण्यात येत आहे. तसेच श्री. जगताप यांनी मांडलेले भ्रष्टाचारविषयक मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरूण कृष्णा गवेकर
२५अे/२०२, सुयोग, बिंबीसारनगर, पश्चिम द्रुतगती महामार्ग,
गोरेगाव (पू), मुंबई-६५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, चंदगड,
ता.चंदगड, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड,
ता.चंदगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२+२२३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरूण कृष्णा गवेकर
२५अे/२०२, सुयोग, बिंबीसारनगर, पश्चिम द्रुतगती महामार्ग,
गोरेगाव (पू), मुंबई-६५

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.११.२००६ (अ.क्र.२२२)<br>दि.३१.३.२००६ (अ.क्र.२२३) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००६ (अ.क्र.२२२)<br>दि.१३.७.२००७ (अ.क्र.२२३) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९.४.२००७(अ.क्र.२२२+२२३) |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.७.२००७(अ.क्र.२२२+२२३) |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे सुनावणीलाही गैरहजर होते.

गौण खनिजाचे बेकायदेशीर उत्खनन, रॉयल्टी वसुली आदिबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर यांनी वसुलीची कार्यवाही चालू असल्याचे कारण देऊन व वसुली पूर्ण होताच माहिती देण्यात येईल, असे कळवून नाकारली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील मुदतीत नसल्याच्या कारणावरून अयोग्य प्रकारे नाकारले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अरूण कृष्णा गवेकर यांनी केली.

श्री.गवेकर यांनी एका व्यक्तीच्या संदर्भातील तपशीलवार माहिती मागितली हाती. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर यानी विहित मुदतीत उत्तर दिले. तसेच वसुलीबाबतची माहितीही नंतर देण्यात येऊन अभिलेखात उपलब्ध नसलेल्या कागदपत्रांच्या प्रती श्री.गवेकर यांना पुरविण्यात आल्या. संबंधित व्यक्तीविरूध्द चंदगड पोलीस ठाण्यातच दाखल केलेल्या फौजदारी गुन्ह्याची छायांकित प्रतही श्री.गवेकर यांना पुरविण्यात आली. तथापि काही मुद्दयांबाबत त्यांनी मते अथवा भाष्य अपेक्षित केले असून, 'कारवाई का केली नाही, कधी करणार,' अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये अशी विचारणा 'माहिती' ठरत नाही, म्हणून ती देता आली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर श्री.मनोजकुमार ऐतवडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

श्रीमती शीतल भोसले यांनी दि.१५.१२.२००८ रोजी सुनावणीला गैरहजर असण्याबाबतच्या खुलाशासह लेखी केले, ते मान्य करण्यात येत आहे.

अ.क्र.२२३ मध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर श्री.पी.बी.शितोळे यांनी अयोग्य कारणांमुळे माहिती नाकारली व १५ दिवस विलंबाने माहिती दिली, म्हणून त्यांना प्रतीदिन रू.२५० प्रमाणे रूपये ३७००/- करण्यात आली व त्यांनी ती रक्कम भरली, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, चंदगड, ता.चंदगड, जि.कोल्हापूर श्रीमती शीतल भोसले यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शास्तीचे अधिकार अपिलीय प्राधिकारी यांना नाहीत, तरीही त्यांनी केलेली शास्ती ही जणू काही आयोगाने केली, असे समजून त्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भिकाजी केशव संकपाळ — अपीलकर्ता
श्री. गोविंद अर्जुन इनकर
स.नं.३५/१, फ्लॅट नं. १७/२०, संतोषनगर, संत
तुकारामनगर हौ.सो.समोर, पोस्ट दिघी,
विद्यानगर, विश्रांतवाडी, पुणे-१५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सह संचालक (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (सहकार), समाजकल्याण संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. भिकाजी केशव संकपाळ
श्री. गोविंद अर्जुन इनकर
स.नं.३५/१, फ्लॅट नं. १७/२०, संतोषनगर, संत
तुकारामनगर हौ.सो.समोर, पोस्ट दिघी,
विद्यानगर, विश्रांतवाडी, पुणे-१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा — सह संचालक (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.जे.गौड व श्री. जी.के. पाठक

**जन माहिती अधिकारी** तथा — सहाय्यक संचालक (सहकार), समाजकल्याण संचालनालय, पुणे श्री. आर.बी. कुमावत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

संतोषनगर, पुणे येथे १९९५ मध्ये ग्रामपंचायत असताना बांधलेल्या समाज मंदिराचे मंजूर अंदाजपत्रक व इतर कागदपत्रांची मागणी आपण केली होती. परंतु कोणतीही कागदपत्रे महानगरपालिकेकडे नसल्याचे आपल्याला कळविण्यात आले. अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कागदपत्रांची तपासणी करुन माहिती देण्याचे आदेश दिल्यानंतरही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ते श्री. भिकाजी केशव संकपाळ व श्री. गोविंद अर्जुन इनकर यांनी केली.

बांधकामाचे प्रस्ताव ग्रामपंचायत करते. मंजूर नकाशा आणि अंदाजपत्रक संचालक, समाजकल्याण, जिल्हा परिषद यांच्याकडे पाठविले जातात. त्यामुळे जिल्हा परिषदेकडे अर्ज वर्ग केला होता. गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार), समाजकल्याण संचालनालय, पुणे श्री. आर. बी. कुमावत यांनी नमूद केले.

या संदर्भातील जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडील सर्व कागदपत्रांच्या प्रती पंधरा दिवसांत अपीलकर्त्यास द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन ग्रामपंचायत, विद्यानगर, ता. हवेली येथील समाज मंदिराबाबतची माहिती अपीलकर्त्यांना दि. ३०.१२.२००८ रोजी देण्यात आली असून तशी पोहच अपीलकर्त्यांनी दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार), समाजकल्याण संचालनालय, पुणे यांनी संबंधित पोहच असल्याच्या पत्रासह नमूद केले. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (सहकार), समाजकल्याण संचालनालय, पुणे श्री. आर.बी.कुमावत यांनी दि. ३०.१२.२००८ च्या पत्रान्वये संबंधित माहितीच्या प्रतींसह त्याबाबत आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपत धनवडे
अध्यक्ष, अखिल भारतीय भ्रष्टाचार विरोधी मंच, सातारा,
मु.पो.नुने, ता.जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२३+१६४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा प्रतिनिधी श्री.एम.ए.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा श्री.दी.ब.नलावडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण दिलेल्या वकीलाबद्दल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा यांनी गैरवक्तव्य केले ते कोणत्या अधिकारात अशी माहिती अपीलकर्ता श्री.गणपत धनवडे यांनी मागितली होती. त्याबाबतचे उत्तर विहित मुदतीत देण्यात आले. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचे अपील फेटाळले.(अपील क्र.२२३). तसेच आरटीएस फेरतपासणी अर्जाच्या प्रमाणित नकलेची मागणी श्री.धनवडे यांनी केली होती. त्यांना शुल्क कळविण्यात आले, परंतु त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले. १५ दिवसात माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला, त्यानुसार श्री.धनवडे यांना कार्यालयात स्वतः उपस्थित राहून नक्कल स्वीकारली. तशी त्यांची पोहोच आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा श्री.दी.ब.नलवडे व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री.व्ही.एन.देशमाने यांनी केले. आपल्याला दिलेली नक्कल खोटी असल्याचे श्री.धनवडे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात म्हटले आहे. तथापि, संबंधित प्रकरणाची संपूर्ण संचिका त्यांना दाखविण्यात आल्या असून स्वतः सादर न केलेल्या अर्जाची प्रत ते मागत आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.दी.ब.नलवडे व अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.एन.देशमाने यांनी प्रपत्रात नमूद केले. आरटीएस-रिव्हीजन अर्ज क्र.२/२००६ श्री.लक्ष्मण गुरव विरूध्द श्री.तुकाराम कासुर्डे वगैरे कुळे याबाबतच्या निकालाची मागणी अनेक व्यक्तींनी केली असून हे अर्ज निरनिराळ्या व्यक्तींच्या नावे एकाच व्यक्तीने त्रास देण्याच्या हेतूने केलेले दिसून येतात, असे जन माहिती अधिकारी श्री.दी.ब.नलवडे यांनी लेखी नमूद केले. या संदर्भातील मूळ अर्जदार श्री.जयसिंग भिकू लिम्हण यांनी आयोगाकडे सादर केलेल्या अपिलात

(अपील क्र.२६० / सातारा) माहिती प्राप्त झाल्याचे व कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे लेखी दिलेले आहे, असेही श्री.नलवडे यांनी दि.२२..१.२००९ च्या पत्रान्वये निदर्शनास आणले आहे. याची दखल घेण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

पुणे
दि.१०.१२.२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४,
ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाहूपुरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८+ २६१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४, ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एस.टी.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाहूपुरी, जि.कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.आर.एस.मिठारी व ॲड. प्रदीप जे. वाघ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२०८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या लेखा परीक्षण अहवालाची प्रमाणित प्रत आपण मागणी करूनही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही बँकेने दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांनी केली. बँकेला कोणतेही शासकीय भागभांडवल नाही. तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या आर्थिक अनुदान मिळत नाही. त्यामुळे बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, अशी भूमिका आपण प्रत्येक अपिलात घेतली आहे, असे प्रतिपादन बँकेचे प्रतिनिधी ॲड. प्रदीप जे. वाघ यांनी केले. तसेच अपीलकर्त्याने ज्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत मागितली होती, ते लेखा परीक्षण त्यावेळी झालेले नव्हते. त्यामुळे अहवाल बँकेकडे आला नव्हता, असेही ॲड.वाघ यांनी नमूद केले. या भूमिकेतूनच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाला आव्हान देणारे अपील (क्र.२६१) श्री. दिपक शं. चव्हाण यांनी आयोगाकडे केले आहे.

संबंधित माहिती बँकेच्या स्तरावरील असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असे सहकार आयुक्त, निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.८.२.२००६ च्या परिपत्रकान्वये स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे बँकेला हा कायदा लागू होतो व बँकेने माहिती देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एस.टी.भोसले यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे प्रतिपादन बँकेतर्फे सातत्याने करण्यात आले आहे. तथापि, अपिलीय प्राधिकाऱ्यांचे निवेदन लक्षात घेता, बँकेला हा कायदा लागू असून बँकेने माहिती देणे आवश्यक आहे. या संदर्भात कायदा लागू होण्याविषयी मतभेद आहेत, असे मान्य केले व त्याबाबतचा अंतिम निर्णय आयोगाने दिलेला नसला, तरी नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी संबंधित माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
'विराम' गोळीबार मैदान, फलटण, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३+२४+२७+२८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
'विराम' गोळीबार मैदान, फलटण, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री.व्ही.एन.देशमाने

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
फलटण उपविभाग, ता.फलटण, जि.सातारा श्रीमती रेश्मा माळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.९.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर अन्य व्यक्तीची नोंद केली. अस्तित्वात नसलेला व खोटा उतारा तलाठ्याने दिला. याबाबतच्या तक्रारीवर प्रांत अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावयास हवा होता. त्या ऐवजी त्यांनी तो तहसीलदारांकडे पाठविला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर यांनी केली. श्री.नाईक निंबाळकर या स्वरूपाच्या एकाच विषयाशी संबंधित अर्ज व अपिले वारंवार करीत असून वेळोवेळी त्यांच्या सर्व मुद्दयांना उत्तरे देण्यात आली आहेत. अन्य व्यक्तींच्या नावाची ७/१२ उताऱ्यावर नोंद, तलाठ्याने दिलेल्या उताऱ्याची सत्यता या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसून प्रशासकीय कार्यवाहीविषयक आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, ता.फलटण, जि.सातारा श्रीमती रेश्मा माळी यांनी केले. श्री.नाईक निंबाळकर सातत्याने प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या तक्रारीचे अर्ज माहितीच्या अधिकारात करीत आहेत. कार्यवाहीच्या कायदेशीरपणाबाबत त्यांची तक्रार असल्यास त्यांनी वरिष्ठ न्यायासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. त्याबाबतही वेळोवेळी लेखी नमूद करण्यात आलेले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री.व्ही.एन.देशमाने यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.नाईक निंबाळकर एकाच विषयाच्या तक्रारीसंबंधी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न येणाऱ्या कार्यवाहीच्या मागणीसाठी अर्ज व अपिले करीत आहेत असे दिसते. सर्व संबंधित यंत्रणांवर अकारण कामाचा

ताण टाकणारी व या यंत्रणांचा वेळ व परिश्रम वाया घालविण्यास कारणीभूत ठरणारी अशी ही कृती आहे. त्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि.२१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. शामराव आनंदराव गायकवाड
एफ-७, लँडमार्क रेसिडेन्सी, सर्कीट हाऊस
समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, इंदिरा नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.५.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. शामराव आनंदराव गायकवाड, एफ-७, लँडमार्क रेसिडेन्सी, सर्कीट हाऊस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा — व्यवस्थापक, इंदिरा नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

इंदिरा नागरी सहकारी पतसंस्थेच्या व्यवस्थापकाने प्रथम माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्या आदेशानंतरही माहिती दिली नाही. पतसंस्थेच्या व्यवस्थापकांनी समक्ष चर्चेत माहिती देण्याचे मान्य करूनही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शामराव आनंदराव गायकवाड यांनी केली.

श्री. गायकवाड यांनी सन १९९३ ते २००२ या काळातील विस्तृत माहिती मागितली आहे. संस्थेत अत्यंत अपुरा कर्मचारी वर्ग असून श्री. गायकवाड यांनी स्वतः संस्थेत उपस्थित राहून अभिलेखाचे अवलोकन करुन माहिती प्राप्त करून घ्यावी, असे त्यांना लेखी व तोंडी वेळोवेळी सांगण्यात आले. ते संस्थेचे सभासद नाहीत, फक्त ठेवीदार आहेत व संस्थेच्या अनेक सभासद कर्जदारांची माहिती निव्वळ संस्थेला त्रास देण्याच्या हेतूने मागत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन त्या पतसंस्थेचे व्यवस्थापक श्री. वसंत गणपतराव शृंगारे यांनी केले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना लागू नाही. ते लक्षात घेता श्री. गायकवाड यांची तक्रार दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभू बाजीराव खंडागळे
उपळाई रोड, देशमुख प्लॉट, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभू बाजीराव खंडागळे
उपळाई रोड, देशमुख प्लॉट, बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.रा.ग.पवार

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी,
ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.पी.डी.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दि.१८.१२.१९९७ रोजी आपल्याकडून वसूल केलेल्या रकमेची शासकीय पावतीची स्थळप्रत आपल्याला दिली नाही. संबंधित रक्कम कार्यालयातील तिजोरीत शिल्लक ठेवलेली आहे, असे उपविभागीय अधिकारी, मृदसंधारण अधिकारी (भू.वि.) नॉनकडा, बार्शी, जि.सोलापूर यांनी लेखाधिकारी यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट नमूद आहे. याचा अर्थ ती पावती कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे, तरीही ती देण्याऐवजी आपण न मागितलेली माहिती दिली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रभू बाजीराव खंडागळे यांनी केली.

सन १९९७ चे अभिलेख पाहिले असता रक्कम कॅशबुक व बँकेत जमा आहे. त्याची पावती नसल्यामुळे देता येत नाही. उपलब्ध पावती व चलनाची छायांकित प्रत दिलेली आहे. एकाच चलनाने रू.३०,००० बँकेत भरलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून कपात केलेल्या तेवढ्याच रकमेची स्वतंत्र पावती नसणे ही अभिलेखातील त्रुटी आहे. श्री.खंडागळे यांच्या संदर्भात वसुली प्रकरणी चालू असलेल्या चौकशीचा निर्णय अद्याप झालेला नसल्यामुळे संबंधित रक्कम बँकेत तशीच आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.रा.ग.पवार यांनी केले. ज्या कारणासाठी पैसे वसूल केले त्याची पावती श्री.खंडागळे यांना देण्यात आली आहे, तसेच वसुलीची रक्कम बँक खात्यावर व कॅशबुकमध्ये

जमा असल्याची प्रतही त्यांना देण्यात आली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.पी.डी.पाटील यानी केले. तसे पत्र अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.खंडागळे यांना दि.२५.११.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.रा.ग.पवार यांनी आयोगास अवगत केले. तथापि आपल्याला योग्य माहिती मिळालेली नाही. दोन वर्षे होऊनही आपल्याला माहिती मिळत नाही अशी तक्रार अपीलकर्ता श्री.प्रभू बाजीराव खंडागळे यांनी दि.११.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. याबाबत आयोगाने दि.१६.२.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा मागविला असता, विशिष्ट पावतीची प्रत वगळता कार्यालयाने अपीलकर्त्यास वसुली रकमेबाबत संपूर्ण तपशील पूर्वीच दिला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.३.२००९ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह आयोगास अवगत केले. परंतु श्री.खंडागळे यांच्या अन्य तक्रारी व मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्नीकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४,
ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी(महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, जि.कोल्हापूर                    उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्नीकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४, ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी(महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.के.बी.खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.जी.जी.ढेकणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.११.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पूरग्रस्तांना दिलेल्या सानुग्रह अनुदानाची आपण मागणी केलेली माहिती देण्यास १५ दिवसाची मुदतवाढ मागूनही जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी मुदतीत माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी केली.

श्री.निकम यांनी मागितलेली माहिती सन २००५ मधील होती. सानुग्रह अनुदानाच्या वाटपात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार श्री.निकम यांचे एक सहकारी श्री.प्रभाकर साळुंके यांनी केली होती. श्री.साळुंके यांच्या तक्रारीची चौकशी होऊन त्याबद्दलची माहिती त्यांना दि.१२.१२.२००६ रोजी त्यांना देण्यात आली होती. दि.१२.२.२००७ च्या मंजूर टिपणीनुसार सदर नस्ती बंद करण्यात आली. याबाबतची सर्व माहिती श्री.निकम यांना प्रथम अपिलावरील चर्चेच्या वेळी देण्यात आली. तहसीलदार, मंडल अधिकारी, तलाठी इत्यादि कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांकडून संकलित करून वाढीव मुदतीच्या आत श्री.निकम यांना माहिती देण्यात आली. संबधित कागदपत्रांच्या नकलाही देण्यात आल्या. अनुदान वाटपातील वसुलीबाबत (प्रशासकीय) कार्यवाही करून त्याबाबतची माहिती व चलनाच्या प्रतीही देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी तथा प्रमुख

लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.जी.जी.ढेकणे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.बी.के.खैरे यांनी लेखी व तोंडी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. विशिष्ट नमुन्यातच माहिती मिळण्याचा अपीलकर्त्याचा आग्रह असून त्यानुसार माहिती देणे शक्य नसल्याचे त्यांना स्पष्ट करण्यात आले, असेही श्री.ढेकणे व श्री.खैरे यांनी नमूद केले. ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीसह विलंबाबाबतचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२३.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**